IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

# "आंतरजालावरील मराठी संकेतस्थळाचा उपयोग"

**सन्मती गजानन हणशी.**
पदव्युत्तर विद्यार्थीनी मराठी विभाग,
विलिंग्डन महाविद्यालय,सांगली (स्वायत्त)
sanmatijaygound@gmail.com

**सारांश** (Abstract) *: आजचा काळ हा माहिती व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने झपाट्याने प्रगती करणारा काळ आहे. संगणक, मोबाईल आणि इंटरनेट यांच्या साहाय्याने जग अगदी लहान झाले आहे. कोणतीही माहिती काही क्षणांत आपल्या हातात येते. या सर्व प्रक्रियेत आंतरजालाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.*

*मराठी भाषा टिकवायची असेल तर तिचा प्रसार करणे व जतन करणे गरजेचे आहे. नव्या तंत्रज्ञानात मराठीला बसवणे व वापरणे महत्त्वाचे आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात संगणकाचा विकास झाला. संगणक मोठ्या प्रमाणात वापरले जाऊ लागले. सी-डॅकसारख्या संस्थांनी भारतीय भाषा संगणकाला अनुकूल बनवण्यासाठी कष्ट घेतले.*

*पूर्वी ज्ञान मिळवण्यासाठी पुस्तके, वर्तमानपत्रे आणि ग्रंथालये यांच्यावर अवलंबून राहावे लागायचे. मात्र आता आंतरजालामुळे माहिती मिळवण्याची पद्धत पूर्णपणे बदलली आहे. विसाव्या शतकाच्या अखेरीस संगणकाचा वापर अपरिहार्य बनला. सर्वांत अगोदर वर्तमानपत्रांनी हे तंत्रज्ञान स्वीकारले आणि १९८०-९० च्या दशकात तालुक्यापर्यंत वापर पोहचला. नंतर आंतरजालाचे तंत्रज्ञान आले. यावर मराठी यायलाच हवी असे वाटले. आज अनेक युनिकोड फॉंट उपलब्ध आहेत. मराठी भाषेचा वापर करता आला तर अनेक संधी खुल्या होतील. शिक्षण, व्यवसाय, मनोरंजन, प्रशासन अशा सर्व क्षेत्रांमध्ये इंटरनेटचा वापर वाढला आहे.*

*मराठी भाषा ही समृद्ध परंपरा आणि साहित्य असलेली भाषा आहे. आजच्या डिजिटल युगात मराठी भाषेनेही आंतरजालावर आपले स्थान निर्माण केले आहे. विविध मराठी संकेतस्थळांच्या माध्यमातून माहिती, ज्ञान, साहित्य आणि बातम्या सहज उपलब्ध होत आहेत.*

*आंतरजालाची संकल्पना, विविध प्रकारची संकेतस्थळे आणि विशेषतः मराठी संकेतस्थळांचा उपयोग कसा होतो याचा आढावा घेतला आहे.*

**की - वर्ड** : आंतरजालावरील मराठी संकेतस्थळाचा उपयोग

## I. प्रस्तावना :

आजचा काळ हा माहिती व तंत्रज्ञानाच्या सहाय्याने झपाट्याने प्रगती करणारा काळ आहे. संगणक, मोबाईल आणि इंटरनेट यांच्या साहाय्याने जग अगदी लहान झाले आहे. कोणतीही माहिती काही क्षणांत आपल्या हातात येते. या सर्व प्रक्रियेत आंतरजालाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे.

मराठी भाषा टिकवायची असेल तर तिचा प्रसार करणे व जतन करणे गरजेचे आहे. नव्या तंत्रज्ञानात मराठीला बसवणे व वापरणे महत्त्वाचे आहे. विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात संगणकाचा विकास झाला. संगणक मोठ्या प्रमाणात वापरले जाऊ लागले. सी-डॅकसारख्या संस्थांनी भारतीय भाषा संगणकाला अनुकूल बनवण्यासाठी कष्ट घेतले.

पूर्वी ज्ञान मिळवण्यासाठी पुस्तके, वर्तमानपत्रे आणि ग्रंथालये यांच्यावर अवलंबून राहावे लागायचे. मात्र आता आंतरजालामुळे माहिती मिळवण्याची पद्धत पूर्णपणे बदलली आहे. विसाव्या शतकाच्या अखेरीस संगणकाचा वापर अपरिहार्य बनला. सर्वांत अगोदर वर्तमानपत्रांनी हे तंत्रज्ञान स्वीकारले आणि १९८०-९० च्या दशकात तालुक्यापर्यंत वापर पोहचला. नंतर आंतरजालाचे तंत्रज्ञान आले. यावर मराठी यायलाच हवी असे वाटले. आज अनेक युनिकोड फॉंट उपलब्ध आहेत. मराठी भाषेचा वापर करता आला तर अनेक संधी खुल्या होतील. शिक्षण, व्यवसाय, मनोरंजन, प्रशासन अशा सर्‌व क्षेत्रांमध्ये इंटरनेटचा वापर वाढला आहे.

मराठी भाषा ही समृद्ध परंपरा आणि साहित्य असलेली भाषा आहे. आजच्या डिजिटल युगात मराठी भाषेनेही आंतरजालावर आपले स्थान निर्माण केले आहे. विविध मराठी संकेतस्थळांच्या माध्यमातून माहिती, ज्ञान, साहित्य आणि बातम्या सहज उपलब्ध होत आहेत.

आंतरजालाची संकल्पना, विविध प्रकारची संकेतस्थळे आणि विशेषतः मराठी संकेतस्थळांचा उपयोग कसा होतो याचा आढावा घेतला आहे.
मराठी भाषा व अर्थार्जनाच्या संधी या पुस्तकात डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आंतरजालाची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे,
" आंतरजाल (internet) म्हणजे संगणकांचे जागतिक जाळे होय. या जाळ्यामध्ये जगभरातील लाखो संगणक, सर्व्हर आणि उपकरणे एकमेकांशी जोडलेली असतात. या जोडणीमुळे माहितीची देवाणघेवाण अत्यंत वेगाने आणि सोप्या पद्धतीने होते."

" आंतरजालाच्या साहाय्याने आपण मजकूर, चित्रे, ध्वनी, व्हिडिओ आणि विविध प्रकारची माहिती सहज मिळवू शकतो. ई-मेल, वेबसाइट्स, सोशल मीडिया, ऑनलाइन शिक्षण, ई-कॉमर्स यांसारख्या अनेक सेवा आंतरजालामुळे शक्य झाल्या आहेत."

" सोप्या शब्दांत सांगायचे झाले तर, आंतरजाल हे एक असे माध्यम आहे जे संपूर्ण जगाला एका जाळ्यात जोडते आणि माहितीच्या आदानप्रदानाला गती देते."

यावरून असे म्हणता येईल की आजच्या काळात आंतरजालाशिवाय जीवनाची कल्पनाही करणे कठीण झाले आहे. त्यामुळे आंतरजालाचे महत्त्व दिवसेंदिवस वाढत आहे.

## Ii. आंतरजालातील विविध संकेतस्थळे:

**1) शैक्षणिक संकेतस्थळे:**

Ebalbharati https://ebalbharati.in
 इयत्ता 1 ते 12 पर्यंतची पाठ्यपुस्तके, वर्कबुक्स व डिजिटल शैक्षणिक सामग्री येथे उपलब्ध आहे.
Balbharati store https://store.ebalbharati.in

 विविध वर्गांची अधिकृत पाठ्यपुस्तके व शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणारे पोर्टल.
Shaalaa.com https://www.shaalaa.com

 विद्यार्थ्यांसाठी नोट्स, प्रश्नपत्रिका, उत्तरसंच व अभ्यास साहित्य उपलब्ध आहे.
Evidyarthi https://www.evidyarthi.in

 विविध विषयांवरील मराठी माध्यमातील अभ्यास साहित्य व माहिती उपलब्ध आहे.
Marathi shala https://bmmonline.org/marathishala

 मराठी शिक्षणासाठी ऑनलाइन उपक्रम, प्रश्नमंजुषा व शैक्षणिक सामग्री उपलब्ध आहे.
Diksha https://diksha.gov.in

 शालेय शिक्षणासाठी व्हिडिओ, qr कोड आधारित अभ्यास सामग्री व interactive content उपलब्ध आहे.
Epathshala https://epathshala.nic.in

 ncert ची डिजिटल पुस्तके व शैक्षणिक साधने येथे उपलब्ध असून काही सामग्री मराठीतही आहे.
Swayam https://swayam.gov.in

 उच्च शिक्षणासाठी विविध ऑनलाइन कोर्सेस उपलब्ध असून काही अभ्यासक्रम मराठीमध्येही आहेत.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

Mahanmk https://www.mahanmk.com

 स्पर्धा परीक्षांसाठी प्रश्नसंच, चालू घडामोडी व सराव परीक्षा उपलब्ध आहेत.
Studywadi https://www.studywadi.in
 सामान्यज्ञान, निबंध, भाषण व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त माहिती उपलब्ध आहे.
Marathi vishwakosh https://marathivishwakosh.org
 विविध विषयांवरील सखोल माहिती देणारा मराठी ज्ञानकोश असून संशोधनासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

"आंतरजालावर e-balbharati, balbharati store, shaalaa.com, evidyarthi, marathi shala, diksha, epathshala, swayam, mahanmk, studywadi आणि मराठी विश्वकोश यांसारखी अनेक शैक्षणिक मराठी संकेतस्थळे उपलब्ध आहेत. या संकेतस्थळांद्वारे विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके, नोट्स, व्हिडिओ लेक्चर्स, प्रश्नसंच व विविध विषयांवरील माहिती मराठीत सहज उपलब्ध होते. त्यामुळे शिक्षण अधिक सुलभ, प्रभावी आणि सर्वसमावेशक बनते." विद्यार्थ्यांसाठी ही संकेतस्थळे विशेष उपयुक्त ठरतात.

**2) बातम्या संकेतस्थळे:**

**Lokmat** – https://www.lokmat.com
हे महाराष्ट्रातील अत्यंत लोकप्रिय मराठी वृत्तपत्राचे संकेतस्थळ आहे. येथे देश-विदेशातील लोकांना या संकेतस्थळाद्वारे वाचकांना क्रीडा आणि मनोरंजनाशी संबंधित चालू घडामोडींच्या बातम्या उपलब्ध होतात.

**Loksatta** – https://www.loksatta.com
लोकसत्ता हे इंडियन एक्सप्रेस समूहाचे मराठी संकेतस्थळ असून सखोल विश्लेषणात्मक बातम्यांसाठी ओळखले जाते. राजकारण व सामाजिक विषयांवर दर्जेदार लेख येथे मिळतात.

**Sakal** – https://www.esakal.com
सकाळ हे प्रसिद्ध मराठी वृत्तपत्र असून या संकेतस्थळावर विविध क्षेत्रांतील ताज्या बातम्या आणि विशेष लेख उपलब्ध असतात. स्थानिक बातम्यांवरही याचा भर असतो.

**Abp majha** – https://marathi.abplive.com
हे एक लोकप्रिय मराठी न्यूज चॅनेलचे संकेतस्थळ आहे. येथे लाईव्ह न्यूज, व्हिडिओ रिपोर्ट्स आणि ब्रेकिंग न्यूज त्वरित पाहायला मिळतात.

**Tv9 marathi** – https://www.tv9marathi.com
टीव्ही9 मराठी हे डिजिटल माध्यमावर सक्रिय असलेले न्यूज प्लॅटफॉर्म आहे. वेगवान आणि तत्काळ बातम्या देण्यासाठी हे संकेतस्थळ प्रसिद्ध आहे.

**Zee 24 taas** – https://zeenews.india.com/marathi
झी 24 तास हे मराठी न्यूज चॅनेल असून त्याच्या संकेतस्थळावर व्हिडिओ बातम्या, विशेष कार्यक्रम आणि चालू घडामोडींचे अपडेट्स मिळतात.

**Maharashtra times** – https://maharashtratimes.com
महाराष्ट्र टाइम्स हे टाइम्स समूहाचे मराठी संकेतस्थळ आहे. येथे ताज्या बातम्या, लेख आणि विविध विषयांवरील माहिती उपलब्ध असते.

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429 Volume 6, Issue 7, June 2026 Impact Factor: 8.2

Saamana – https://www.saamana.com
सामना हे मराठी दैनिक असून त्याच्या संकेतस्थळावर राजकीय आणि सामाजिक विषयांवरील बातम्या व संपादकीय लेख प्रकाशित होतात.

Pudhari – https://www.pudhari.news
पुढारी हे मराठी दैनिक असून विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील बातम्यांसाठी ओळखले जाते. स्थानिक घडामोडींवर याचा भर असतो.

Divya marathi – https://divyamarathi.bhaskar.com
दिव्य मराठी हे दैनिक भास्कर समूहाचे मराठी संकेतस्थळ आहे. येथे विविध विषयांवरील बातम्या, विशेष लेख आणि अपडेट्स मिळतात.

"आंतरजालावर लोकमत, लोकसत्ता, सकाळ, एबीपी माझा, टीव्ही9 मराठी, झी 24 तास, महाराष्ट्र टाइम्स, सामना, पुढारी आणि दिव्य मराठी यांसारखी अनेक मराठी बातम्या संकेतस्थळे उपलब्ध आहेत. या संकेतस्थळांद्वारे वाचकांना ताज्या देश विदेशातील चालू घडामोडी, राजकारण, क्रीडा, मनोरंजन, सामाजिक, अर्थव्यवस्था यासंबंधी माहिती देणारी संकेतस्थळे या प्रकारात येतात. ही संकेतस्थळे आपल्याला कोठेही कोणत्याही क्षणी माहिती त्वरित उपलब्ध करून देतात.

3) **मनोरंजन संकेतस्थळे** :

Zee5 – https://www.zee5.com
Zee5 हे लोकप्रिय ott प्लॅटफॉर्म असून येथे मराठी चित्रपट, वेब सिरीज आणि मालिका उपलब्ध आहेत. प्रेक्षकांना विविध प्रकारचे मनोरंजन एका ठिकाणी मिळते.

Sonyliv – https://www.sonyliv.com
Sonyliv वर मराठी मालिका, शो आणि चित्रपट उपलब्ध असून प्रेक्षकांना ऑनलाइन मनोरंजनाची सुविधा मिळते. हे एक बहुभाषिक डिजिटल प्लॅटफॉर्म आहे.

Disney+ hotstar – https://www.hotstar.com
Disney+ hotstar वर मराठी चित्रपट, मालिका तसेच क्रीडा आणि इतर मनोरंजन कार्यक्रम उपलब्ध आहेत. हे भारतातील अत्यंत लोकप्रिय ott प्लॅटफॉर्म आहे.

Youtube – https://www.youtube.com
Youtube वर अनेक मराठी मनोरंजन चॅनेल्स उपलब्ध आहेत. विनोदी व्हिडिओ, लघुपट, गाणी आणि वेब सिरीज यामुळे हे एक महत्त्वाचे माध्यम बनले आहे. उदा. Rajshri marathi, bhadipa, zee marathi आणि star pravah या चॅनेल्सवर मराठी लघुपट व मनोरंजनात्मक कार्यक्रम उपलब्ध असून प्रेक्षकांना दर्जेदार कंटेंट सहज पाहायला मिळतो.

Planet marathi – https://planetmarathi.com
Planet marathi हे मराठी कंटेंटसाठी तयार केलेले ott प्लॅटफॉर्म आहे. येथे मराठी चित्रपट, वेब सिरीज आणि विशेष कार्यक्रम उपलब्ध असतात. उदा. June हा चित्रपट आणि soppana sundari ही वेब सिरीज प्रेक्षकांना डिजिटल माध्यमातून पाहायला मिळते, ज्यामुळे मराठी मनोरंजन अधिक सुलभ झाले आहे.

Mx player – https://www.mxplayer.in

Mx player वर मराठी चित्रपट, वेब सिरीज आणि विविध मनोरंजन कार्यक्रम मोफत उपलब्ध असतात. हे एक लोकप्रिय डिजिटल मनोरंजन माध्यम आहे.

Hungama play – https://www.hungama.com/play

Hungama play वर मराठी चित्रपट, गाणी आणि व्हिडिओ कंटेंट उपलब्ध आहे. प्रेक्षकांना विविध प्रकारचे डिजिटल मनोरंजन येथे मिळते.

"आंतरजालावर zee5, sonyliv, disney+ hotstar, youtube, planet marathi, mx player आणि hungama play यांसारखी अनेक मनोरंजन संकेतस्थळे उपलब्ध आहेत. या संकेतस्थळांद्वारे प्रेक्षकांना मराठी चित्रपट, मालिका, वेब सिरीज, गाणी आणि विविध कार्यक्रम सहज उपलब्ध होतात, ज्यामुळे मनोरंजनाचे स्वरूप अधिक डिजिटल व सुलभ झाले आहे."

**4) शासकीय संकेतस्थळे :**

Maharashtragovernment portal – https://www.maharashtra.gov.in

हे महाराष्ट्र शासनाचे अधिकृत संकेतस्थळ असून विविध शासकीय योजना, धोरणे आणि माहिती येथे उपलब्ध असते. नागरिकांना शासनाच्या सेवांची माहिती एका ठिकाणी मिळते.

Mahadbt https://mahadbt.maharashtra.gov.in

महा dbt (direct benefit transfer) हे महाराष्ट्र शासनाचे एक महत्त्वाचे पोर्टल असून विविध शासकीय योजनांचे लाभ थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा केले जातात. उदाहरणात या पोर्टलद्वारे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, शेतकऱ्यांना कृषी अनुदान, तसेच इतर सामाजिक योजनांचे आर्थिक लाभ ऑनलाइन अर्ज करून मिळतात. या प्रणालीमुळे भ्रष्टाचार कमी होतो, पारदर्शकता वाढते आणि लाभार्थ्यांना थेट आर्थिक मदत मिळते, त्यामुळे शासनाच्या योजना प्रभावीपणे अंमलात येतात.

Aaple sarkar – https://aaplesarkar.mahaonline.gov.in

'आपले सरकार' हे नागरिकांसाठी ऑनलाइन सेवा देणारे पोर्टल आहे. विविध प्रमाणपत्रे, अर्ज व तक्रारी यासाठी ही सुविधा वापरली जाते.

Mahaonline – https://www.mahaonline.gov.in

Mahaonline हे ई-गव्हर्नन्स पोर्टल असून विविध शासकीय सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देते. उदा. नोंदणी सेवा, अर्ज प्रक्रिया व विविध विभागांच्या सेवा या पोर्टलद्वारे उपलब्ध होत असून नागरिकांना शासकीय सेवा सहज व जलद मिळतात, त्यामुळे नागरिकांना वेळ आणि श्रम वाचवण्यास मदत होते.

Uidai – https://uidai.gov.in

Uidai चे संकेतस्थळ आधार कार्ड संबंधित सेवा प्रदान करते. आधार नोंदणी, अद्ययावत माहिती व डाउनलोड सुविधा येथे उपलब्ध आहे.

Digital india – https://www.digitalindia.gov.in

Digital india हा भारत सरकारचा डिजिटल उपक्रम असून विविध शासकीय सेवा ऑनलाइन उपलब्ध करून देते. उदा. Digilocker व e-governance सेवा यांद्वारे नागरिकांना कागदपत्रे सुरक्षित ठेवणे व शासकीय सेवा सहज मिळवणे शक्य होते.

Pm india – https://www.pmindia.gov.in

हे पंतप्रधान कार्यालयाचे अधिकृत संकेतस्थळ असून शासनाच्या योजना, उपक्रम व भाषणांची माहिती येथे उपलब्ध असते. उदा. विविध सरकारी योजना व पंतप्रधानांचे संदेश या पोर्टलद्वारे नागरिकांना थेट मिळतात, ज्यामुळे प्रशासन अधिक पारदर्शक बनते.

Maharashtra police – https://www.mahapolice.gov.in
महाराष्ट्र पोलीसांचे संकेतस्थळ नागरिकांसाठी सुरक्षा व तक्रार नोंदणीसाठी उपयोगी आहे. उदा. ऑनलाइन तक्रार नोंदणी व माहिती सेवा या पोर्टलद्वारे उपलब्ध असून नागरिकांना पोलीस सेवा सहज मिळतात. "आंतरजालावर महाराष्ट्र शासन पोर्टल, आपले सरकार, mahaonline, uidai, digital india, पंतप्रधान कार्यालय आणि महाराष्ट्र पोलीस सरकारच्या विविध योजना, अर्ज प्रक्रिया, सूचना आणि अधिकृत माहिती या संकेतस्थळांद्वारे मिळते. व नागरिकांना विविध शासकीय सेवा, योजना, प्रमाणपत्रे व माहिती ऑनलाइन सहज उपलब्ध होते, ज्यामुळे प्रशासन अधिक पारदर्शक व कार्यक्षम बनते. नागरिकांना शासकीय सेवा ऑनलाइन मिळवण्यासाठी ही संकेतस्थळे अत्यंत उपयुक्त ठरतात."

5) **सामाजिक माध्यम संकेतस्थळे** :

Facebook – https://www.facebook.com
फेसबुक हे जगातील सर्वात लोकप्रिय सामाजिक माध्यमांपैकी एक आहे. याच्या माध्यमातून लोक आपले विचार, फोटो, व्हिडिओ शेअर करतात व इतरांशी संवाद साधतात.

Whatsapp – https://www.whatsapp.com
व्हॉट्सॲप हे जलद संदेशवहनासाठी वापरले जाणारे ॲप आहे. यामध्ये मजकूर, फोटो, व्हिडिओ व व्हॉइस कॉलच्या माध्यमातून संवाद साधता येतो.

Instagram – https://www.instagram.com
इंस्टाग्राम हे फोटो व व्हिडिओ शेअरिंगसाठी लोकप्रिय सामाजिक माध्यम आहे. विशेषतः तरुणांमध्ये याचा वापर मोठ्या प्रमाणावर होतो.

Twitter – https://www.twitter.com
ट्विटर हे मायक्रोब्लॉगिंग संकेतस्थळ असून येथे लहान संदेश (tweets) द्वारे विचार मांडले जातात. बातम्या व चालू घडामोडींसाठी हे महत्त्वाचे माध्यम आहे.

Youtube – https://www.youtube.com
यूट्यूब हे व्हिडिओ शेअरिंग प्लॅटफॉर्म असून शिक्षण, मनोरंजन व माहिती यासाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जाते.

Telegram – https://telegram.org
टेलिग्राम हे संदेशवहन व माहिती शेअरिंगसाठी वापरले जाणारे ॲप आहे. यामध्ये ग्रुप्स व चॅनेल्सच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर माहिती प्रसारित केली जाते.

Sharechat – https://sharechat.com
Sharechat हे भारतीय भाषांमध्ये, विशेषतः मराठीत, सामग्री शेअर करण्यासाठी लोकप्रिय सामाजिक माध्यम आहे. स्थानिक भाषेतील कंटेंट यावर मोठ्या प्रमाणात उपलब्ध असतो. "आंतरजालावर फेसबुक, व्हॉट्सॲप , इंस्टाग्राम, ट्विटर, यूट्यूब, टेलिग्राम आणि शेअरचॅट यांसारखी सामाजिक माध्यम संकेतस्थळे मोठ्या प्रमाणावर वापरली जातात. या माध्यमांद्वारे लोकांमध्ये संवाद साधणे, माहितीची देवाणघेवाण करणे आणि विचार व्यक्त करणे अधिक सोपे झाले आहे. त्यामुळे सामाजिक संवादाचे स्वरूप अधिक गतिमान व प्रभावी बनले आहे."

6) व्यावसायिक संकेतस्थळे :

Justdial – https://www.justdial.com
येथे विविध व्यवसायांची माहिती मराठीतही उपलब्ध होते. तसेच स्थानिक सेवा शोधण्यासाठी उपयोग होतो उदा. रेस्टॉरंट, हॉस्पिटल व इतर सेवा शोधण्यासाठी या पोर्टलचा उपयोग होतो, ज्यामुळे ग्राहकांना योग्य सेवा निवडणे सोपे होते.

Sulekha – https://www.sulekha.com
विविध सेवा शोधण्यासाठी ह्या संकेतस्थळाचा वापर केला जातो. उदा. ट्यूशन, प्लंबिंग, इलेक्ट्रिशियन अशा सेवांसाठी सेवा प्रदाते सहज शोधता येतात.

Olx – https://www.olx.in
वापरलेल्या वस्तूंची खरेदी-विक्री करता येते. मराठी वापरकर्त्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर वापरले जाते. उदा. जुनी मोबाईल, फर्निचर, गाड्या इत्यादी वस्तू खरेदी किंवा विक्री करता येतात.
नोकरी, घरभाडे व इतर सेवा यासाठी वापरले जाणारे संकेतस्थळ. उदा. नोकरी शोधणे, घरभाड्याची माहिती मिळवणे तसेच विविध सेवा शोधणे शक्य होते.

Mahaagri – https://www.mahaagri.gov.in
शेतकऱ्यांसाठी कृषी माहिती व सेवा देणारे संकेतस्थळ (मराठीमध्ये). उदा. पिकांची माहिती, शासकीय योजना व कृषी मार्गदर्शन ऑनलाइन मिळते. Justdial, sulekha, olx, quikr व mahaagri यांसारखी संकेतस्थळे मराठी वापरकर्त्यांसाठी उपयुक्त ठरतात. त्यामुळे व्यावसायिक क्षेत्रात मराठीचा वापर हळूहळू वाढत आहे. ऑनलाइन खरेदी-विक्री, व्यवसाय आणि सेवा देण्यासाठी वापरली जाणारी संकेतस्थळे. या सर्व प्रकारच्या संकेतस्थळांमुळे आंतरजालाचा वापर अधिक व्यापक आणि उपयुक्त बनला आहे.

### Iii. मराठी आंतरजाल संकेतस्थळे :

मराठी भाषेत आंतरजालावर अनेक संकेतस्थळे उपलब्ध आहेत आणि त्यांचा उपयोग विविध प्रकारे केला जातो. मराठी संकेतस्थळे प्रामुख्याने बातम्या, शिक्षण, साहित्य, ब्लॉग, मनोरंजन आणि शासकीय माहिती यांसाठी वापरली जातात. मराठी बातम्या संकेतस्थळे लोकांना त्यांच्या
मातृभाषेत ताज्या घडामोडी समजावून सांगतात. त्यामुळे माहिती समजणे अधिक सोपे होते. मराठी ब्लॉग आणि साहित्य संकेतस्थळे नवोदित लेखकांसाठी एक उत्तम व्यासपीठ उपलब्ध करून देतात. कविता, कथा, लेख, उखाणे आणि लोकसाहित्य या माध्यमातून मराठी संस्कृती जपली जाते. शैक्षणिक क्षेत्रातही मराठी संकेतस्थळांचा मोठा उपयोग होतो. विद्यार्थ्यांना त्यांच्या भाषेत नोट्स, मार्गदर्शन आणि अभ्यास साहित्य उपलब्ध होत असल्यामुळे त्यांचा अभ्यास अधिक प्रभावी होतो. ग्रामीण भागातील लोकांसाठी मराठी संकेतस्थळे विशेष महत्त्वाची ठरतात. कारण त्यांना त्यांच्या भाषेत माहिती सहज मिळते. त्यामुळे डिजिटल तफावत कमी होण्यास मदत होते. तथापि, काही मराठी संकेतस्थळांमध्ये अद्ययावत माहितीचा अभाव, तांत्रिक मर्यादा आणि गुणवत्तेचा प्रश्नही आढळतो. त्यामुळे या क्षेत्रात अजून सुधारणा होण्याची आवश्यकता आहे. याशिवाय, आंतरजालावरील डिजिटल माध्यमांमुळे मराठी साहित्याचा प्रसार अधिक वेगाने होत आहे.

Youtube – https://www.youtube.com□ या माध्यमावर मराठी कवितांचे विविध चॅनेल्स उपलब्ध असून काव्यवाचन, कवी संमेलन आणि स्पोकन पोएट्री मोठ्या प्रमाणावर पाहायला मिळते. उदा. Marathi kavi sammelan व being marathi यांसारख्या चॅनेल्सवर कवींच्या कविता सादर केल्या जातात. तसेच विष्णु वामन शिरवाडकर, मंगेश पाडगावकर आणि वसंत बापट यांसारख्या प्रसिद्ध कवींच्या कविताही या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर प्रसारित होत असून मराठी काव्यसंस्कृतीचा प्रसार होत आहे. तसेच, आंतरजालावर मराठी कथा, लेख, उखाणे आणि लोकसाहित्य यांसाठीही विविध माध्यमे उपलब्ध आहेत. Youtube – https://www.youtube.com□ या माध्यमावर विविध प्रकारचे साहित्य मोठ्या प्रमाणावर उपलब्ध आहे. उदा. Marathi ukhane या चॅनेल्सवर पारंपरिक उखाणे उपलब्ध असतात, katha marathi वर विविध कथा सादर केल्या जातात. तसेच studywadi वर

IJARSCT
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology
International Open-Access, Double-Blind, Peer-Reviewed, Refereed, Multidisciplinary Online Journal
ISSN: 2581-9429
Volume 6, Issue 7, June 2026
Impact Factor: 8.2

निबंध व लेखनसाहित्य मिळते आणि being marathi या चॅनेलवर लोकसाहित्य व संस्कृतीशी संबंधित माहिती उपलब्ध असते. एकूणच, मराठी संकेतस्थळे ही मराठी भाषेच्या प्रसारासाठी आणि ज्ञानवृद्धीसाठी अत्यंत महत्त्वाची साधने आहे

## Iv. समारोप :

आंतरजालावरील मराठी संकेतस्थळांचा उपयोग हा आजच्या डिजिटल युगात अत्यंत महत्त्वाचा ठरतो. या संकेतस्थळांमुळे मराठी भाषेचा वापर वाढत असून ज्ञान मिळवण्याची प्रक्रिया अधिक सुलभ झाली आहे. मराठी संकेतस्थळांच्या माध्यमातून शिक्षण, माहिती, मनोरंजन आणि संवाद या सर्व गोष्टी एका क्लिकवर उपलब्ध होत आहेत. त्यामुळे मराठी भाषिकांसाठी ही एक मोठी संधी आहे. भविष्यात अधिक दर्जेदार, अद्ययावत आणि आकर्षक मराठी संकेतस्थळे निर्माण झाली तर मराठी भाषेचा जागतिक स्तरावर प्रसार होऊ शकतो. त्यामुळे प्रत्येकाने मराठी संकेतस्थळांचा वापर वाढवून आपल्या भाषेचा सन्मान राखणे आवश्यक आहे.

## संदर्भः

१. शिंदे डॉ. व्ही. एन., मराठी भाषा व अर्थार्जनाच्या, संधी डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.
२. देव डॉ. सदाशिव, मराठी भाषा आणि संगणक, राजहंस प्रकाशन, पुणे.
३. गायकवाड डॉ. सुनील, इंटरनेट आणि माहिती तंत्रज्ञान, निराली प्रकाशन, पुणे.
४. पाटील डॉ. अनिल, ई-शिक्षण आणि आधुनिक तंत्रज्ञान, विद्या प्रकाशन, मुंबई.
५. जोशी डॉ. बी. आर, माहिती तंत्रज्ञान परिचय, साईनाथ प्रकाशन, पुणे.

## इंटरनेट संदर्भः

६. Lokmat https://www.lokmat.com
७. Loksatta https://www.loksatta.com
८. Sakal https://www.esakal.com
९. Abp majha https://marathi.abplive.com

Copyright to IJARSCT
www.ijarsct.co.in
DOI: 10.48175/IJARSCT-37529